प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com



पुरस्कार विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत अनुपमा काटकर, प्रा. अजिंक्य सगरे, श्रद्धा माने, डॉ. विक्रम पाटील व इतर.

# सायबर सुरक्षेत 'यशोदा'च्या विद्यार्थ्यांचे कार्य कौतुकास्पद

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**

डिजिटल युगात आपण मोबाईल, संगणकसह इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे व सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तंत्रज्ञानावर अवलंबून आहोत. विविध बँका, आरोग्य सेवा, वित्तीय संस्था, कंपन्या या इंटरनेटशी कनेक्ट असलेली उपकरणे वापरतात. त्यांची गोपनीय माहिती, आर्थिक व वैयक्तिक डेटा, संवेदनशील माहिती आदिंच्या गोपनीयतेसाठी सायबर सुरक्षा महत्त्वाची आहे. यासाठी क्विक हिल फाउंडेशनने राबवलेल्या सायबर शिक्षा व सुरक्षा अभियानात यशोदाच्या विद्यार्थ्यांचे कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन क्विक हिल फाउंडेशन चेअरपर्सन अनुपमा काटकर यांनी केले.

यशोदा टेक्निकल कॅम्पसमध्ये क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियानातांतर्गत क्विक हिल फाउंडेशन : सायबर शिक्षा व सायबर सुरक्षा पुरस्कार वितरण समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी महाविद्यालयातील सर्व क्लब ऑफिसर्स, विद्यार्थि प्रतिनिधींचा सत्कार क्विक हिल फाउंडेशनतर्फे करण्यात आला.

यामध्ये सर्वोत्तम प्रक्रिया अनुपालन विजेता पुरस्कार आदित्य यादव आणि प्रतीक पवार , रनरअप पुरस्कार साक्षी कोकाटे आणि गौरी शिंगटे यांना मिळाला. सर्वोच्च ऑफलाईन आउटरीच विजेता पुरस्कार वैष्णवी देशमुख व स्नेहल पवार, रनरअप पुरस्कार हर्ष कल्याणकर व गणेश फडतरे यांना तर सर्वोच्च ऑनलाईन आउटरीच विजेता पुरस्कार आर्या शिंदे व प्रतीक्षा महणवर, रनरअप पुरस्कार सोनाली कांठे व ज्योती राठोड यांना मिळाला. सर्व यशस्वीतांचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे, उपाध्यक्ष प्रा. अजिंक्य सगरे, प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, श्रद्धा माने, अजय शिर्के, डॉ. सरिता बलशेटवार यांच्यासह मान्यवरांनी अभिनंदन केले.